आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता
३० मार्च २०२५ -रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सणांतून दिसणारी एकतेची भावना सातत्यानं बळकट करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बात मधून आवाहन

- नागपूरमधे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वर्षप्रतिपदा उत्सवात प्रधानमंत्र्यांचा सहभाग, तर छत्तीसगढ मधे ३३ हजार सातशे कोटी रुपये पेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण

- छत्तीसगडमधल्या बिजापूर जिल्ह्यातल्या ५० माओवाद्यांचं आत्मसर्पण

- म्यानमांमधल्या भूकंपात दगावलेल्यांची संख्या सतराशेवर

**आणि**

- आयपीएलमधे विशाखापट्ट्णम इथं सुरु झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सवर ७ गडी राखून विजय

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरच्या 'मन की बात' कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे विसावा भाग होता. आपल्या सणांतून दिसणारी एकतेची भावना आपल्याला सातत्यानं बळकट करायची आहे असं आवाहन त्यांनी केलं. महाराष्ट्रातल्या गुढीपाडव्यासह, देशभरात विविध ठिकाणी येत्या काही दिवसात नववर्षाच्या स्वागतासाठी साजऱ्या होणार असलेल्या रोंगाली बिहू, पोईला बोइशाख, नवरेह सणाच्या, तसंच ईदच्याही शुभेच्छा त्यांनी दिल्या.

परीक्षा संपून लागलेल्या उन्हाळी सुट्ट्यांमध्ये विद्यार्थी आणि युवा वर्गानं नवी कौशल्ये शिकावीत यावर त्यांनी भर दिला. या निमित्तानं प्रधानमंत्र्यांनी उन्हाळी सुट्टीसाठी तयार केलेल्या MY-Bharat या दिनदर्शिकेची माहिती दिली. उन्हाळा सुरु झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी जल संवर्धनावरही भर दिला. यानिमित्तानं त्यांनी कॅच द रेन या मोहीमेची माहिती दिली.

अलिकडेच झालेल्या खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये दिव्यांग खेळाडूंनी केलेल्या कामगिरीची प्रधानमंत्र्यांनी प्रशंसा केली. यानिमित्तानं तंदुरुस्तीविषयी बोलतांना त्यांनी दिल्लीमध्ये आयोजित फिट इंडिया कार्निव्हलविषयी सांगितलं. आपापल्या परिसरात अशा प्रकारचे कार्निव्हल आयोजित करण्याचं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं.

पर्यावरणासाठी धोकादायक ठरत असलेल्या टेक्स्टाईल वेस्ट अर्थात कपड्यांपासून निर्माण होत असलेल्या कचऱ्यांच्या नव्या आव्हानाविषयी बोलताना असा कचरा निर्माण करण्यात आज भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर असल्याची जाणिव त्यांनी करून दिली. मात्र यावरही अनेक स्टार्टअप्स आणि संस्था उपाय शोधत आहेत, शाश्वत फॅशन आणि कचरा व्यवस्थापनासाठी अभिनव पद्धतीनं काम करत आहेत, असं त्यांनी सांगितलं...

**होल्ड बाईट - TEXTILE**

**<><><><><>**

संघटन, समर्पण आणि सेवेची त्रिवेणी भारताला पुढं घेऊन जाण्यासाठी महत्वाचं सूत्र ठरणार असून विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी समाजातल्या सर्व घटकांनी याचा अवलंब करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र

मोदी यांनी आज नागपुरात केलं. माधव नेत्रालयाच्या प्रीमियम सेंटरचं भूमिपूजन करताना ते बोलत होते. देशातल्या सर्व नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा देणं ही आपली प्राथमिकता आहे, असं सांगत माधव नेत्रालय यात आपलं योगदान देत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले…

**बाईट मोदी- नेत्रालय**

देशातल्या गरीब, मध्यमवर्गीय नागरिकांना स्वस्त दरात औषधं उपलब्ध करून दिली जात आहे. वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढली आहे, मेडिकलच्या जागा वाढल्या आहेत, जास्तीत जास्त आणि चांगले डॉक्टर तयार करणं हे सरकारचं ध्येय असल्याचं ते म्हणाले.

माधव नेत्रालय केवळ महाराष्ट्रासाठीच नाही तर संपूर्ण मध्य भारतासाठी उपयोगी संस्था ठरेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. तर हे नेत्रालय लोककल्याणाच्या प्रेरणेनं अव्याहतपणे कार्यरत आहे, असं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले.

त्याआधी प्रधानमंत्र्यांनी रेशिमबाग इथं स्मृती मंदिराला भेट दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ केशव बळीराम हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर यांच्या स्मृतीस्थळांना त्यांनी आदरांजली वाहिली. त्यानंतर दीक्षाभूमीवर जाऊन त्यानी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली वाहिली. नागपूर - अमरावती रस्त्यावरल्या बाजारगाव इथल्या सोलर एक्सप्लोजिव्ह टेस्ट रेंज आणि रन वे सुविधेचंही प्रधानमंत्र्यांनी आज उद्घाटन केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज छत्तीसगढ मधे ३३ हजार सातशे कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. बिलासपूर जिल्ह्यात मोहभट्टा इथं झालेल्या या कार्यक्रमात

वीज निर्मिती, रस्तेबांधणी, रेल्वे, शिक्षण आणि गृहनिर्माण प्रकल्पांचा समावेश होता. विकासाची फळं आदिवासी भागातल्या प्रत्येकापर्यंत पोहचावी याकरता सरकार प्रयत्नात कसूर करणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत ३ लाख लाभार्थ्यांना घरांच्या किल्ल्या प्रधानमंत्र्यांच्या हस्ते देण्यात आल्या. अभनपूल- रायपूर दरम्यान मेमू गाडीचं उद्घाटनही त्यांच्या हस्ते झालं.

<><><><><>

चंद्रदर्शन आज संध्याकाळी झाल्यानं रमजानच्या पवित्र महिन्याची सांगता करणारा ईद-उल-फित्र हा सण देशभरात उद्या साजरा होणार आहे.
राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी ईद-उल-फित्रच्या पूर्वसंध्येला देशात आणि परदेशात राहणाऱ्या सर्व नागरिकांना, विशेषतः मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा उत्सव बंधुता, सहकार्य आणि करुणेचा संदेश देतो, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या बिजापूर जिल्ह्यातल्या ५० माओवाद्यांनी आज आत्मसर्पण केलं. यात प्रत्येकी ६८ लाख रुपये इनाम असणाऱ्या १४ नक्षलींचा समावेश असल्याचं पोलिसांनी सांगितलं. सैन्य आणि प्रशासनानं दुर्गम खेड्यात केलेल्या सुविधांमुळे प्रभावित होऊन या नक्षलींनी आत्मसर्पण केल्याचं पोलीस अधीक्षकांनी सांगितलं.

या नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणाबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आनंद व्यक्त केला आहे. इतर नक्षलवाद्यांनाही हिंसाचार सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्याचं आवाहन शहा यांनी समाज माध्यमावर केलं आहे.

दरम्यान, छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात माओवाद्यांनी पेरलेल्या आयईडीचा स्फोट होऊन आज एका आदिवासी महिलेचा मृत्यू झाला.

<><><><><>

म्यानमांमधल्या भूकंपात दगावलेल्यांची संख्या सतराशेवर पोचली आहे. संसाधनांच्या कमतरतेमुळे आणि संपर्क तुटल्यामुळे बचावपथकाला हाताने ढिगारे उपसावे लागत आहेत. दरम्यान म्यानमांला आज पुन्हा एकदा भूकंपाचा धक्का बसला. ५ पूर्णांक १ दशांश रिश्टर स्केल तीव्रतेचा या भूकंपाचे केंद्र मंडाले या दुसऱ्या मुख्य शहराजवळ होते. या भूकंपात झालेल्या हानीबद्दल काहीही वृत्त अद्याप आलेलं नाही. दरम्यान टोंगा या पॅसिफिक द्वीपसमूहातल्या बेटावरही आज ७ पूर्णांक १ दशांश रिश्टर तीव्रतेचा भूकंप झाल्याचं वृत्त आहे. थायलंडमध्ये भूकंपग्रस्त भागात बचावकार्य सुरु आहे. भूकंपात दगावलेल्यांचा आकडा सतरावर पोचला असून त्र्याऐंशीजण अजून बेपत्ता आहेत.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज विशाखापट्ट्णम इथं झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं सनराईजर्स हैदराबादवर ७ गडी राखून विजय मिळवला. ७ गडी आणि २४ चेंडू राखून विजय मिळवला.

सनराईजर्स हैदराबाद संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र त्यांचा डाव ८ चेंडू बाकी असताना १६३ धावात आटोपला. तर दिल्ली कॅपिटल्सनं १६ षटकात ३ गड्यांच्या मोबदल्यात १६६ धावा केल्या.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना गुवाहाटी इथं राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सुरु आहे. चेन्नई सुपर किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा राजस्थान रॉयल्सच्या १५ व्या षटकात ५ बाद १४० धावा झाल्या होत्या.

<><><><><>

चेन्नई इथं सुरु असलेल्या डब्ल्यूटीटी स्टार कंटेंडर टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीत भारताचा अव्वल मानांकित मानव ठक्कर याचं आव्हान आज संपुष्टात आलं. उपांत्य फेरीत फ्रान्सच्या बिगर मानांकित थिबॉल्ट पोरेट यानं मानवचा १२-१०, ११-९, ७-११, ११-७ असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

जॉर्डनमध्ये अम्मान इथं सुरु आशियाई कुश्ती स्पर्धेत भारतीय कुस्तीपटू उदित आणि दीपक पुनिया यांनी फ्रीस्टाईल प्रकारात अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उदितनं चीनच्या वानहाओ झोउचा २-० असा पराभव केला. तर दीपक पुनियानं जपानच्या ताकाशी इशिगुरोचा ८-१ असा पराभव केला.

पुरुषांच्या फ्रीस्टाइलमध्ये ८६ किलो वजनी गटात मुकुल दहियानं उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

//<><><><><>//